# डे. ए. सो. चे बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स , पुणे -४
## शिष्यवृत्ती सूचना २०२१-२२

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी अनुसूचित जाती व जमाती, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (SC,ST,OBC,VJNT,SBC,EWS) या संवर्गातून महाविद्यलयात (वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय) प्रवेश घेतला आहे त्या विद्यार्थ्यांने शासनाने विहित केलेल्या नमुन्यात शिष्यवृत्ती/ फ्रीशिप चा ऑनलाइन अर्ज भरणे बंधनकारक आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी हा ऑनलाइन अर्ज **https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाइटवर डिसेंबर, २०२१ पासून ऑनलाइन भरणे सुरू झाले आहे सदर **अर्ज व्यवस्थित पूर्ण भरून सर्व खालील कागदपत्रे जोडून महाविद्यालयात सर्व संवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. ३१ मार्च , २०२२ पूर्वी जमा करावा.**

**ज्या विद्यार्थ्यांनी २०२०-२१ मध्ये अर्ज अपूर्ण भरला आहे, दुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांच्या लॉगिनला आहे किंवा रि-अप्लायसाठी आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी अर्ज व्यवस्थित पूर्ण भरून सर्व खालील कागदपत्रे जोडून महाविद्यालयात दि. ३१ मार्च , २०२२ पूर्वी जमा करावा .**

शिष्यवृत्ती (Scholarship) साठी **व्हीजेएनटी/ ईमाव / विमाप्र या संवर्गाकरिता उत्पन्न मर्यादा १,५०,०००/- असून, अनुसूचित जाती** वा **अनुसूचित जमाती या संवर्गाकरिता उत्पन्न मर्यादा** २,५०,०००/- इतकी आहे. तसेच फ्रीशिप **अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती** साठी उत्पन्न मर्यादा नसून, **व्हीजेएनटी/ ईमाव / विमाप्र साठी ची उत्पन्न मर्यादा** रु. ८,००,०००/- इतकी आहे.

**सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः चा मोबाइल न.बँक खाते व आधार कार्ड शी लिंक करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्याची शिष्यवृत्ती/ फ्रीशिप जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील, तसेच एक वेळेस एकच शिष्यवृत्तीचा लाभ घेत येईल अर्ज भरताना कुठलीही अडचण येत असल्यास महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागास संपर्क साधावा.**

**नवीन (फ्रेश) विद्यार्थ्यांसाठी** ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. आधारकार्डला मोबाईल नंबर व विद्यार्थ्यांचे बँक खाते न लिंक असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरताना आधार कार्ड ला लिंक असलेल्या मोबाईल वर OTP येतो तो Verified करावा. खालील शिष्यवृत्ती/ फ्रीशीपचा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्याने mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर लॉगिन करून त्यातील Profile मधील सहा टॅब **(Personal Information, Address Information, Other Information, Current Course, Past Qualification, Hostel Details)** व्यवस्थित भरणे आवश्यक आहे. प्रोफाइल पूर्ण भरून झाल्यावर खालीलपैकी योग्य ती स्कीम निवडून अप्लाय करावी.

**रिन्यूअल विद्यार्थ्यांसाठी** ऑनलाईन अर्ज भरताना Profile मधील Personal Information मध्ये Income certificate ची माहीती अपडेट करावी. व Current Course मधील माहिती अपडेट करून गुणपत्रिका अपलोड करावी व चालू वर्षाची माहिती भरून व फी शून्य टाकावी. प्रोफाइल पूर्ण भरून झाल्यावर खालीलपैकी योग्य ती स्कीम निवडून अप्लाय करावी.

**1) SC Scholarship/ Freeship साठी :- Social Justice and Special Assistance Department मध्ये (Sr. & Jr. College)**
**Government of India Post-Matric Scholarship (Scholarship) / Post-Matric Tuition Fee and Examination fee (Freeship)**

**2) VJNT, OBC & SBC Scholarship / Freeship साठी :- VJNT, OBC & SBC Welfare Department मध्ये (Sr. & Jr. College)**
**Post-Matric Scholarship to VJNT Students (Scholarship) / Tuition Fee and Examination fees to VJNT Stud. (Freeship)**
**Post-Matric Scholarship to OBC Students (Scholarship) / Tuition Fee and Examination fees to OBC Students (Freeship)**
**Post-Matric Scholarship to SBC Students (Scholarship) / Tuition Fee and Examination fees to SBC Students (Freeship)**

**3) ST Scholarship / Freeship साठी :- Tribal Development Department मध्ये (Sr. & Jr. College)**
**Post-Matric Scholarship Scheme (Government of India) (Scholarship)/Tuition Fee & Exam Fee for Tribal Students (Freeship)**

**4) Director of Higher Education Department मध्ये (Sr. College)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Scheme | 5. | Dr. Punjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (DHE) |
| 2 | Assistance to Meritorious Students scholarship - Senior Level | 6 | Education Concession to the Children of Ex-Servicemen |
| 3 | State Government Open Merit Scholarship | 7 | Education Concession to the Children Freedom Fighter |
| 4 | Eklavya Scholarship | | |

**5) School Education and Sport Department मध्ये (Jr. College)**

**Open Merit Scholarship in Junior College / Merit Scholarship for Economical Backward Class Student**

**शिष्यवृत्ती/ फ्रीशीप साठी आवश्यक असणारे सर्व मूळ कागदपत्रे (Original Documents) अपलोड करावीत**

| अ. क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | शिष्यवृत्ती/ फ्रीशीप अर्ज -२०२१-२२ (अर्जावर शेवटच्या पानावर विद्यार्थ्यांची व पालकाची नाव व सही करणे आवश्यक) |
| २. | कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला (तहसीलदार यांनी दिलेला) |
| ३. | रहिवासी / डॉमिसाईल प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी दिलेला) |
| ४. | विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र |
| ५. | रेशन कार्ड झेरॉक्स |
| ६. | गुणपत्रिका झेरॉक्स (गुणपत्रिका - १० वी, १२ वी, एफ वाय बी कॉम, एस वाय बी कॉम, टी वाय बी कॉम, एम कॉम -१) |
| ७. | महाविद्यालय प्रवेश पावती झेरॉक्स |
| ८. | वसतिगृह प्रवेश पावती झेरॉक्स (आवश्यक असल्यास) |
| ९. | खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) (आवश्यक असल्यास) |
| १०. | विहित नमुन्यातील प्रतिज्ञा पत्र |
| ११. | शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला (१० वी / १२ वी / टी. वाय बी. कॉम.) |
| १२. | बँक खात्यामध्ये आधार क्रमांक मिळविण्यासाठी / डीबीटी लाभ मिळविण्यासाठी अर्ज (एन पी सी आय मॅपिंग) |
| १३. | आधार कार्ड झेरॉक्स |
| १४. | बँक पास बुक झेरॉक्स (आधार कार्डशी लिंक असलेले) |

**सदर शिष्यवृत्ती व फ्रीशिप चा अर्ज अचूक भरून वरील कागदपत्रासोबत ( नमूद केलेल्या क्रमानुसार ) हार्ड कॉपी महाविद्यालयात सर्व संवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. ३१ मार्च , २०२२ पूर्वी जमा करावा.**

२१/०३/२०२२

प्राचार्या

प्रभारी प्राचार्य
बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय
(स्वायत्त)
पुणे-४११००४